महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा क्रः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२४-२५/२०२४/ 3252 दिनांक : ०७.०८.२०२४

0 8 AUG 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत..**

संदर्भ : महाडीबीटी संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेली नोटीस.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांकरीता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** (संकेतस्थळ-www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात,

१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.**
२. **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना.**
३. **उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना**

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता,** महाडीबीटी पोर्टल नोंदणीकृत असणा-या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी महाडीबीटी पोर्टल दिनांक २३.०७.२०२४ पासून सुरु करण्यात आलेले आहे.

महाडीबीटी पोर्टलवर प्रदर्शित केल्यानुसार, **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता**, डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांचे अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरण्याची प्रक्रिया **दिनांक २३.०७.२०२४ पासून** सुरु केलेली आहे. (सोबत महाडीबीटी पोर्टल स्क्रीनशॉट जोडला आहे)

या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला असल्याने आपल्या संस्थेत शिकणा-या व उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज (नवीन/नुतनीकरण) लवकरात लवकर भरुन घ्यावेत, तसेच संस्था स्तरांवर प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर/नामंजूर) काढावेत.

**महत्वाची सूचना**

१. संस्थांनी डीबीटी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.
२. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक ०८ जुलै, २०२४ रोजीचा शासन निर्णय व दिनांक १९ जुलै, २०२४ रोजीचे शासन परिपत्रकानुसार पात्र मुलींना शिक्षण शुल्कामध्ये १०० टक्के सवलत लागू असल्याने, त्यानुसार पात्र विद्यार्थीनींच्या ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जांमध्ये शिष्यवृत्तीच्या रकमेचा लाभ दिसून येत असल्याबाबत खात्री झाल्यानंतरच असे अर्ज पुढील मान्यतेस्तव फॉरवर्ड करावेत. योग्य रकमेचा लाभ दिसत नसेल तर, अशाबाबतीत महाडीबीटी पोर्टलवरील संस्थेच्या लॉगीनमधून ग्रीव्हन्स दाखल करावेत.

४. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वतः योग्य ती दक्षता घ्यावी. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**


५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन शिष्यवृत्ती योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**

६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या ई.बी.सी. शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत : महाडीबीटी पोर्टलवरील स्क्रीनशॉट.

(डॉ. दि. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे


dbtworkflow.mahaonline.gov.in

आपले सरकार महाDBT Scrutiny Portal

Institute Profile i.e. Fees Data Entry Submission and Approval Process for New Academic Year 24-25 has been

Notice

- Institute Profile i.e. Fees Data Entry Submission and Approval Process for New Academic Year 24-25 has been Commenced from 23'rd July 2024. *New*

Application — Scrutiny — Allotment — Disbursement

The Government of Maharashtra has introduced the Direct Benefit Transfer (DBT) Service through which the beneficiaries can apply for benefit from Schemes of various departments such as 'Social Justice and Special Assistance', 'Tribal Development', 'Directorate of Higher Education', 'Directorate of Technical Education', 'School Education and Sports', 'VJNT,OBC and SBC Welfare', 'Directorate of Medical Education and Research', etc. This benefit is received directly into the Aadhaar linked bank account of the eligible beneficiaries.

- Step 1 **Online Application** - The Citizen applies for a benefit via Direct Benefit Transfer(DBT) Portal.
- Step 2 **Scrutiny**- The applications process for scrutiny.
- Step 3 **Allotment** - After Scrutiny sent for allotment.
- Step 4 **Disbursement** - At this stage benefit is received in aadhaar link bank account of respective beneficiary.

Login

Enter Username

Try another

Enter the text you see above:

Login

Forgot Password?

© 2018 MahaIT(B). All Rights Reserved.

MahaIT